## नि.दि.मु.क्र.०१/२००७ मधील आय.ए. क्र. १/२०२० ते ३/२०२० (निशाणी १६८ ते १७०) वरील संयुक्तीक आदेश

निशाणी १६८ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी, निशाणी १६९ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी व निशाणी १७० कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ ही घाटकोपर, मुंबई येथे मयत झाली. ती मयत झाल्याचे वादींना काहीच माहिती नव्हती. दि. ०६/०७/२०१७ रोजी प्रतिवादींतर्फे न्यायालयात पुरशिस दाखल झाल्यावर प्रतिवादी क्र. ५ ही मयत झाली असल्याचे समजले. तसेच वादी क्र. १ ही गुडघेदुखीने आजारी असल्याने तिला त्वरीत प्रतिवादी क्र. ५ हिचा मृत्यूदाखला आणि वारसांची माहिती मिळू शकली नसल्याने अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अवसान पावल्याचे वादींचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. ५ च्या संभाव्य वारसांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. सदर तिनही अर्जांवर प्रतिवादी क्र. ३ ते ५ आणि ७ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज खोटे व खोडसाळ आहेत, अर्जातील नमूद कारणे सदरचे अर्ज मंजूर करणेस पुरेशी नाहीत. अर्जातील कारणे खोटी असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ५ ही मयत झाली या तथ्याबाबत प्रतिवादींनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. तिच्या मृत्यूनंतर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार वादींकडे टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक आहे. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

वादींना मयत प्रतिवादी क्र. ५ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.01.13 16:40:48 +0530

दि. १३/०१/२०२१ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER